अधिसूचना

क्रमांक : १०४/२०२१ दिनांक : २८.१०.२०२१

विषय : २०१९-२०२० शैक्षणिक सत्राची स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती.

सर्व संबंधितांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्ती दाननिधी विनियमातील तरतुदीप्रमाणे, उन्हाळी २०१९ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, विज्ञान स्नातक भाग-१ व भाग-२ या परीक्षांमध्ये पदार्थ विज्ञान या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करुन प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होणारे व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अनुक्रमे विज्ञान स्नातक भाग-१, भाग-२ व भाग-३ च्या अभ्यासक्रमास पदार्थ विज्ञान विषयासह २०१९-२०२० शैक्षणिक सत्रामध्ये प्रवेश घेतलेले खाली नमूद केलेले विद्यार्थी २०१९-२०२० शैक्षणिक सत्राच्या स्व. श्री शंकरराव गोविंद जोग व श्रीमती पार्वतीबाई शंकरराव जोग शिष्यवृत्तीकरीता पात्र ठरले आहेत.

२०१९-२०२० या शैक्षणिक सत्राची उपरोक्त शिष्यवृत्ती खालील विद्यार्थ्यांना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	नांव व महाविद्यालय	उत्तीर्ण परीक्षा	प्रवेशित वर्ग	प्राप्त गुण	शिष्यवृत्तीची रक्कम
०१.	**कु. मानसी राजेश बच्छा** ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	H.S.S.C.	B.Sc. I	91	500.00
०२.	**कु. अश्विनी गजानन हागे** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट, जि. अकोला.	B.Sc. I (Sem I+II)	B.Sc. II (Sem III)	291	500.00
०३.	**कु. अंजली व्यंकटराव दहिवेले** श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	B.Sc. II (Sem III+IV)	B.Sc. III (Sem V)	289	500.00

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

*****

अधिसूचना

क्रमांक : १०५/२०२१ दिनांक : २८.१०.२०२१

विषय : २०२०-२०२१ शैक्षणिक सत्राची वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती.

सर्व सामान्यांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती दाननिधी विनियम क्र. ३१/१९९८ मधील तरतुदीप्रमाणे, कु. तनुजा बळीराम पोटे या विद्यार्थिनीने वाङमय स्नातक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन व या अभ्यासक्रमाच्या इतिहास विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करुन २०२०-२०२१ या शैक्षणिक सत्रामध्ये श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथे वाङमय पारंगत भाग-१ (इतिहास) या वर्गात प्रवेश घेतल्यामुळे, सदर विद्यार्थिनी २०२०-२०२१ या शैक्षणिक सत्राच्या रु. २,८००/- च्या वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेली आहे.

२०२०-२०२१ या शैक्षणिक सत्रामध्ये रु. २,८००/- (अक्षरी रु. दोन हजार आठशे फक्त) ची वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती कु. तनुजा बळीराम पोटे यांना प्रदान करण्यात येत आहे.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

*****